**ठळक बातम्या**

- अणु ऊर्जा विधेयकावरच्या चर्चेला आज लोकसभेत प्रारंभ
- अंमलबजावणी संचालनालयाचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत काँग्रेसची संसद भवन परिसरात निदर्शनं
- गड किल्ल्यांप्रमाणेच इतर संरक्षित स्मारकांवरचं अतिक्रमण रोखण्यासाठी समिती स्थापन करण्याचा राज मंत्रिमंडळाचा निर्णय
- क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी

आणि

- ऑस्कर नामांकनाच्या निवडक १५ चित्रपटांमधे होमबाऊंड या भारतीय चित्रपटाचा समावेश

**<><><><><>**

अणु ऊर्जा विधेयकावरच्या चर्चेला आज लोकसभेत प्रारंभ झाला. प्रस्तावित कायद्यामुळे २०४७ पर्यंत शंभर गिगावॅट अणु ऊर्जा निर्मितीचं लक्ष्य साध्य होईल, असं केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी विधेयक मांडताना सांगितलं. देशाच्या विकासात हा एक मैलाचा दगड ठरेल असं सिंह म्हणाले. तर या विधेयकात पुरवठादाराचं दायित्व ठरवलं नसल्याने देशासाठी हानीकारक असल्याचं सांगत काँग्रेसचे मनिष तिवारी यांनी विधेयकाला विरोध केला.

सन २०२४-२५ मधे देशातलं कोळसा उत्पादन एक अब्ज टनापर्यंत गेल्याचं कोळसा मंत्री जी किशन रेड्डी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. कोळसा उत्पादन क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा कोळसा उत्पादक आणि वापरकर्ता देश असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं. कोळशापासून वायू निर्मिती करण्यावर सरकारचा भर असून २०३० पर्यंत १० कोटी टन निर्मिती करण्याचं उद्दिष्ट आहे, भूमिगत

वायू निर्मिती करण्याची क्षमता असलेल्या २१ कोळसा खाणींचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

दोन हजार किलोमीटर रेल्वेमार्गावरील कवच प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. प्रवासी आणि रेल्वेच्या सुरक्षेसाठी कवच ही स्वयंचलित ट्रेन सुरक्षा प्रणाली सुरू करण्यात आली असून आतापर्यंत चार हजार किलोमीटर रेल्वेमार्गावर ही प्रणाली स्थापित करण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

अन्नधान्याची साठवण करण्यासाठी विविध राज्यात अडीच हजारापेक्षा जास्त गोदामं सुरू असल्याची माहिती केंद्रीय ग्राहक व्यवहार राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सरकार प्रामुख्याने तांदूळ आणि गहू खरेदी  करतं असं त्या म्हणाल्या.

**टोलवसुली** पद्धतीऐवजी स्वयंचलित नंबर प्लेट ओळख प्रणाली पुढल्या वर्षीपासून लागू केली जाईल, असं रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज राज्यसभेत सांगितलं. महामार्गावर वाहनांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी नवी प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अंमलबजावणी संचालनालयाचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत  आज काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधातल्या मनी लाँड्रिंग प्रकरणी आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीतल्या न्यायालयाने नकार दिला, या पार्श्वभूमीवर सोनिया गांधी आणि राहुल गांधींविरोधात केंद्र सरकार ईडीचा गैरवापर करत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी  केला. काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात सरकारविरोधी घोषणाबाजी करत सरकारने गांधी कुटुंबाची माफी मागण्याची मागणी केली.

**<><><><><>**

राज्यातल्या गडकिल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणची अतिक्रमण रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करायचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज

मंत्रिमंडळाची बैठक झाली. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करायचा निर्णयही यावेळी झाला.

<><><><><>

राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी झालं आहे, अशी माहिती संबंधित तक्रारदाराचे वकील आशुतोष राठोड यांनी आज प्रसारमाध्यमांना दिली. त्यामुळं त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी राठोड यांनी केली. दरम्यान, मंत्रीमंडळ बैठकीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची मुंबई वर्षा निवासस्थानी भेट घेतल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी दिली. याप्रकरणी कोकाटे यांचा राजीनामा घ्यायचा किंवा नाही हे अजित पवार ठरवतील, असंही मिटकरी यांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून मिळवलेल्या चार सदनिकांच्या घोटाळ्याप्रकरणी माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार कोकाटे, आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं काल दोषी ठरवलं होतं.

<><><><><>

"ग्लोबल साऊथ स्वतःचं भविष्य घडवत आहे, भारत आणि इथियोपिया या दोन्ही देशांकडे त्या संदर्भातल्या संकल्पना आहेत", असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्र्यांनी आज इथियोपियाच्या संसदेला संबोधित केलं. इथियोपियाचे प्रधानमंत्री अबीय अहमद अली यांच्यासोबत अदिस अबाबा इथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विस्तृत चर्चा झाली. या भेटीत आठ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. जागतिक पातळीवरील दूरदर्शी नेतृत्व आणि भारत-इथियोपिया भागीदारी बळकट करण्यामध्ये लक्षणीय योगदान दिल्याबद्दल मोदी यांना काल 'द ग्रेट ऑनर निशान ऑफ इथियोपिया' सन्मानानं गौरवण्यात आलं. हा पुरस्कार मिळवणारे मोदी पहिलेच जागतिक राष्ट्रप्रमुख आहेत. तर मोदींना मिळालेला हा २८वा परदेशी पुरस्कार आहे.

<><><><><>

अद्ययावत सुविधा देणारं महाराष्ट्रातलं पहिलं जेन झी टपाल कार्यालय मुंबईत सुरू होत असून आयआयटी मुंबई परिसरात उद्या या कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

***-------व्हीसी------***

*(जेन झी अर्थात तरुण पिढीला टपाल सेवेकडे आकर्षित करण्यासाठी जेन झी टपाल कार्यालयाची संकल्पना देशभरात राबवली जात आहे. दिल्ली, केरळ, बिहार, गुजरात आणि आंध्रप्रदेशात हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता मुंबईत जेन झी टपाल कार्यालय सुरू होत आहे. मोफत वाय-फाय सुविधा, कॅफेटेरिया, वाचनालय, संगीत कक्ष या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या कार्यालयात पूर्णपणे डिजिटल, क्यूआर आधारित सेवा वितरण, आधार नोंदणी आणि अद्ययावत करण्याची सोय देखील असेल. तसंच या टपाल कार्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलती दिल्या जाणार आहेत. स्पीड पोस्ट सेवांवर दहा टक्के सवलत तर मोठ्या प्रमाणात पार्सल पाठवणाऱ्या ग्राहकांना पाच टक्के सवलत दिली जाणार आहे. परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून टपाल कार्यालयाची एक सामुदायिक केंद्र म्हणून ओळख निर्माण करणं हा यामागील हेतू आहे. महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह आणि भारतीय टपाल सेवेच्या टपाल सेवा संचालक केया अरोरा यांच्या हस्ते, आयआयटी मुंबईच्या कुलसचिवांच्या उपस्थितीत, उद्या या टपाल कार्यालयाचं उद्घाटन होणार आहे.)*

**<><><><><>**

ऑस्कर २०२६ अर्थात ९८व्या अकॅडेमी पारितोषिकांसाठीच्या अंतिम फेरीत होमबाऊंड हा भारतीय चित्रपट प्राथमिक फेरी पार करून निवडक पंधरा चित्रपटांच्या यादीत पोचला आहे. नीरज घायवान दिग्दर्शित हा भारतीय चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या श्रेणीत आहे. या यादीतल्या चित्रपटांचं अंतिम नामांकन २२ जानेवारीला जाहीर होईल. ९८वा अकादमी पुरस्कार सोहळा १५ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

**<><><><><>**

मानवाधिकार कार्यकर्ते गौतम नवलखा यांना दिल्लीला घरी जाण्याची परवानगी मुंबई उच्च न्यायालयानं आज दिली. मात्र त्यांना दिल्लीतल्या पोलीस ठाण्यात दर शनिवारी हजेरी द्यावी लागेल तसंच विशेष न्यायालयाच्या पूर्वपरवानगीविना दिल्ली सोडता येणार नाही असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

***//<><><><><>//***